जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४९४ दिनांक ०६/०७/२०२३**

वारजे पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पप्पुल्या ऊर्फ दिग्वीजय तुकाराम वाघमारे (टोळी प्रमुख) व त्याचे ०८ साथीदार यांचे विरुध्द मकोका कायद्यान्वये कारवाई

वारजे माळवाडी पोलीस ठाणे हद्दीत दि.२०/०६/२०२३ रोजी रात्री १२/३० वा.ते ०१/०० वा.चे सुमारास कॅनोल रोड,गल्ली नं.७,ॲक्सिस बँकेचे एटीएम समोर,कर्वेनगर,पुणे येथे यातील फिर्यादी व त्यांचे मित्र असे थांबले असताना पपुल्या वाघमारे व त्याचे इतर ८ ते १० साथीदार दहशत करीत हातातील लोखंडी कोयते व लोखंडी पालघन घेऊन कॅनॉल रोड रस्त्याच्या दोन्ही बाजुस व श्रीमंत बाल तरुण मंडळाचे आजुबाजुस लावलेल्या चारचाकी,दुचाकी वाहनांच्या काचा फोडत नुकसान करत फिर्यादी थांबलेल्या ठिकाणी जवळ येवून पपुल्या वाघमारे याने शिवीगाळ करुन इथे कशाला थांबला आहेस,चल निघ इथुन असे म्हणुन शिवीगाळ करुन,फिर्यादी आम्ही चाललो आहोत असे म्हणाले असता त्यांचे डोक्यावर डाव्या बाजुस,डावे हाताच्या पोटरीवर,पायावर लोखंडी कोयता,लोखंडी पालघनने व साक्षीदार याचे डावे हाताच्या पोटरीवर वार करुन, फिर्यादी यांचा डाव्या हाताचा अंगठा तोडुन त्यांना व रस्त्याने जाणाऱ्या साक्षीदार या मुलास आडवुन त्याचे उजव्या हातावर पालघन,धारधार शस्त्राने वार करुन, त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच कर्वेनगर भागातील लोकांच्या वाहनांचे दहशत पसरवण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. सदरबाबत फिर्यादी यांनी त्यांचेविरुध्द कायदेशिर तक्रार दिल्याने **वारजे माळवाडी पो.स्टे. गु.र.नं.२४८/२०२३,भा.द.वि.क.३०७,३२६,३२५,३२४, ३२३,५०४,५०६,५०६(२),१४३,१४६,१४७,१४८,१४९,भारतीय हत्यार कायदा ४(२५),महा.पो.अधि.का.क. ३७(१)(३),१३५ सह क्रिमिनल लॉ अमेंडमेट ॲक्ट कलम ७** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान सदर गुन्हा हा **१)पप्पुल्या ऊर्फ दिग्वीजय तुकाराम वाघमारे,वय-१९ वर्षे,रा.बराटे चाळ,,दत्तनगर,रामनगर,वारजे माळवाडी,पुणे (टोळी प्रमुख) २)देवीदास बसवराज कोळी वय १९ वर्षे,रा.घर नं.३,कॅनॉल रोड,कर्वेनगर,पुणे ३)भगवान धाकलू खरात, वय २० वर्षे,रा.लेन नं.१०,श्रमिक वसाहत,कर्वेनगर,पुणे ४)लिंगाप्पा ऊर्फ नितीन सुरेश गडदे,वय-२० वर्षे,रा. वडारवस्ती,कर्वेनगर,पुणे ५)मुन्ना नदाफ,रा.रामनगर,वारजे,पुणे ६)सागर जमादार,रा.वडार वस्ती, कर्वे नगर,पुणे ७)करण पुर्ण नाव व पत्ता माहित तसेच ०२ विधि संघर्षित बालक अ.नं.१ ते ४ यांना अटक करण्यात आलेली असून,दोन विधिसंघर्षित बालकांस ताब्यात घेवुन पालंकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.** तसेच **अ.नं.५ ते ७ हे पाहिजे आरोपी आहेत.**

वर नमूद अटक आरोपी यांचेकडे सखोल तपास केला असता आरोपी नामे **१) पप्पुल्या ऊर्फ दिग्वीजय तुकाराम वाघमारे, वय १९ वर्षे,रा.दत्तनगर, सुभाष बराटे चाळ,रामनगर, वारजे माळवाडी,पुणे (टोळी प्रमुख)** याने आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवून स्वतःची संघटीत टोळी तयार करून अपराध केलेले असून यातील आरोपी यांनी **जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,खाजगी मालमत्तेचे नुकसान करणे,बेकायदेशीर जमाव जमविणे,धमकी देणे,बेकायदेशिर अग्नी शस्त्र जवळ बाळगणे,बेकायदेशिर शस्त्र जवळ बाळगणे,पोलीसांच्या आदेशाचा भंग करणे,जनतेच्या मनात दहशत निर्माण करणे,शासकिय कामात अडथळा निर्माण करणे** यासारखे गंभीर गुन्हे वारंवार केले असल्याचे निदर्शनास आले आहे.

यातील आरोपी यांनी संघटित दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थीक फायद्या करीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने, तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१) **(ii),**३(४),प्रमाणेचा अंतर्भाव करणेकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन,पुणे श्री.सुनिल जैतापुरकर यांनी मा.पोलीस उप आयुक्त, परि-३ पुणे शहर श्री.सुहेल शर्मा,यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील,यांना सादर केला आहे होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन वारजे माळवाडी पो.स्टे.गु.र.नं.२४८/२०२३,भा.द.वि.क.३०७,३२६,३२५,३२४,३२३,५०४,५०६,५०६(२),१४३,१४६,१४७,१४८,१४९ भारतीय हत्यार कायदा ४ (२५) महा.पो.अधि.का.क.३७(१)(३),१३५ सह क्रिमिनलली अमेंडमेट ॲक्ट कलम ७ या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१) **(ii),**३(४),या कलमाचा समावेश करणे बाबत मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील,यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा पोलीस आयुक्त, कोथरूड विभाग पुणे शहर श्री.भिमराव टेळे,हे करीत आहेत.

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.सह आयुक्त पुणे शहर,श्री. संदिप कर्णीक, मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर, श्री.प्रविणकुमार पाटील,मा. पोलीस उप आयुक्त परि-३, पुणे शहर,श्री.सुहेल शर्मा, मा.सहा.पोलीस आयुक्त,कोथरूड विभाग,पुणे शहर,श्री भिमराव टेळे यांचे मार्गदर्शनाखाली वारजे माळवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुनिल जैतापुरकर,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.अजय कुलकर्णी, निगराणी पथकाचे तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक यशवंत पडवळे,पोलीस अंमलदार गोणते,सचिन कुदळे,अमोल भिसे,अतुल भिंगारदिवे,विजय खिलारी,नितीन कातुर्डे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ३३ वी कारवाई आहे.**